## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.८ (प्रतिनिधी) :- महात्मा गांधी समजून घेण्याची उत्सुकता आणि भूक तरुण पिढीकडे दिसून येत नाही. गांधी विचार हा अत्यंत गंभीर विचार असून त्यामुळे आयुष्य बदलू शकते असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते अमृत बंग यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विचारधारा प्रशाळेअंतर्गत असलेल्या महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्राच्या वतीने आयोजित गांधी सप्ताहाच्या समारोप प्रसंगी श्री बंग बोलत होते. यावेळी प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा.म.सु.पगारे अध्यक्षस्थानी होते. मंचावर कुलसचिव डॉ.विनोद पाटील, रासेयो संचालक डॉ. सचिन नांद्रे व विभागप्रमुख डॉ.उमेश गोगडीया उपस्थित होते. अमृत बंग म्हणालेकी,गांधी विचारांनी प्रभावित होऊन आमच्या तीन पिढ्या सामाजिक क्षेत्रात काम करीत आहेत. त्यामुळे लक्षात येते की, गांधी विचार हा इव्हेन्ट नसून तो गंभीर विचार आहे. आजोबा ठाकुरदास बंग यांना महात्मा गांधीनी अर्थशास्त्र शिकायचे असेल तर अमेरिकेपेक्षा भारताच्या खेड्यात शिका असे सांगितल्यानंतर ठाकुरदास बंग यांनी ग्रामीण भागात काम सुरू केले आणि आजतागायत माझ्या पिढीपर्यंत हे काम सुरु आहे. न्यायबुध्दी आणि अंत्योदयाचा विचार गांधीनी मांडला. मूल्य आणि आचरणातून ते विचार आले होते. माझे जीवन हेच माझे ध्येय आहे आणि जगात बदल व्हावा वाटत असेल तर सुरुवात स्वत:पासून करा असे महात्मा गांधीनी सांगितले होते. आजची तरुणाई गांधी विचार समजून घेत नाही. गांधींविषयी अपप्रचार करणाऱ्या संघटीत शक्ती कार्यरत आहे. त्यावरुन मत तयार केले जाते. असेही बंग म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात प्रा.म.सु.पगारे यांनी गांधी विचार समजून घेण्यासाठी वाचन वाढविण्याचे आवाहन केले. प्रारंभी डॉ. उमेश गोगडीया यांनी प्रास्ताविक केले. यावेळी निबंध, वक्तृत्व, चित्रकला आणि भित्तीचित्र स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. दीपक खरात यांनी केले.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.८ (प्रतिनिधी) :- विद्यार्थ्यांना उच्च प्रतीचे शिक्षण देण्यासाठी शिक्षकांनी "टेक्नोसेव्ही टू टेक्नोस्मार्ट" होणे ही काळाची गरज आहे. असे प्रतिपादन प्र-कुलगुरु प्रा. एस.टी.इंगळे यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळेद्वारा अद्ययावत तंत्रज्ञानाच्या मदतीने शिक्षकांच्या क्षमता विकासासंदर्भात आयोजित दोन दिवसीय कार्यशाळा व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेच्या सभागृहात आज पासून सुरु झाली. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.इंगळे बोलत होते. यावेळी मंचावर प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानांअतर्गत सॉफ्ट कंम्पोनंटचे समन्वयक प्रा.आशुतोष पाटील व संचालक प्रा. मनिषा इंदाणी हे होते. प्रा. इंगळे म्हणाले की, शिक्षकांनी अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करणे ही काळाची गरज असून शिक्षकांच्या क्षमतांचा विकास होण्याच्या दृष्टीने आयोजित कार्यशाळेत शिक्षकांनी सहभागी होऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाप्रती कार्यमग्न रहावे. विशेषत: जुन्या शिक्षणप्रणालीतून नव्या शिक्षणप्रणालीचा स्वीकार करतांना नव्या तंत्रज्ञानाचा वापर करुन विद्यार्थ्यांना नव्या काळानूसार घडविणे शिक्षकांनी आवश्यक आहे. त्याकरीता आता शिक्षकांना केवळ नव्या तंत्रज्ञानाची माहिती नव्हे तर त्यात पारंगत असणे आवश्यक आहे. केंद्र शासनाने शिक्षकांना अद्ययावत ज्ञान देण्यासाठी पीएम-उषा योजनेअंतर्गत ही व्यवस्था केली आहे असे ते म्हणाले.

प्रा. आशुतोष पाटील यांनी प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानांअतर्गत विद्यापीठास प्राप्त सॉफ्ट कंपोनंट अंतर्गत विविध पंधरा उपक्रम राबवावयाचे असुन त्यातील एक भाग ही कार्यशाळा आहे.या कार्यशाळेद्वारे शिक्षकांनी प्राप्त केलेल्या अद्ययावत ज्ञानाचा प्रत्यक्ष वापर हा विद्यार्थ्यांना शिक्षण देतांना करावयाचा आहे. तसेच या शिक्षकांनी विद्यार्थ्यांनाि शिकवतांना या ज्ञानाचा वापर केला किंवा नाही याचा आढावा घेतला जाणार आहे असे सांगितले. प्रारंभी

संचालक प्रा. मनिषा इंदाणी यांनी प्रास्ताविक करतांना या कार्यशाळेच्या संदर्भात सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. रणजित पारधे यांनी तर आभार प्रा.स्वाती तायडे यांनी मानले. यावेळी व्य.प.सदस्य डॉ. पवित्रा पाटील, प्रा.रमेश सरदार व सहभागी विविध महाविद्यालयातील शिक्षक उपस्थित होते.

उद्घाटनानंतरच्या संत्रात पुणे येथील टिळक महाविद्यालयाचे प्रा.सुरेश इसावे यांचे ई-कंटेंट डेव्हलपमेंट या विषयावर दोन सत्रात ऑनलाईन व्याख्यान झाले. दुपारच्या सत्रात धुळे येथील डॉ. वैभव सबनिस यांनी शिकविण्याचे भविष्यकालीन मार्ग याविषयावर सविस्तर विवेचन केले. यानंतरच्या सत्रात फैजपुर येथील ग्रंथपाल व तज्ज्ञ इरबा गायकवाड यांनी नविन एआय तंत्रज्ञानाचा शिक्षण व संशोधनात उपयोग याविषयावर माहिती दिली.

उद्याचे कार्यक्रम : कार्यशाळेत उद्या बुधवार दि. ०९ ऑक्टोबर रोजी सकाळी दहा वाजता गुजरात भावनगर येथील डॉ.बराट यांचे शिक्षण व्यवस्थापन पध्दती व ई-परीक्षा पध्दती आणि ई-मुल्यांकन या विषयावर व्याख्यान होईल. दुपार सत्रात नंदुरबार येथील प्रा.कैलास चौधरी यांचे डिजीटल कोर्सेसवर व्याख्यान होईल त्यानंतर कार्यशाळेचे समारोप होईल.

.......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ८ ऑक्टोबर, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

जळगाव दि.८ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे दिले जाणारे सन २०२३ चे उत्कृष्ट महाविद्यालये / परिसंस्था / प्राचार्य / शिक्षक आणि उत्कृष्ट अधिकारी कर्मचारी पुरस्कार जाहीर झाले असून व्यावसायिक महाविद्यालये / परिसंस्था गटात शिरपूर येथील आर.सी. पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँण्ड रिसर्च आणि जळगाव येथील जी.एच रायसोनी इन्स्टिट्युट ऑफ इंजि. अँण्ड बिझनेस मॅनेजमेंट संस्थेला संयुक्तपणे जाहीर झाला आहे. तर फैजपूर येथील धनाजी नाना महाविद्यालय हे अव्यावसायिक महाविद्यालय गटात उत्कृष्ट महाविद्यालय ठरले आहे.

हे पुरस्कार मंगळवार दि. ८ ऑक्टोबर रोजी विद्यापीठाने जाहीर केले. दरम्यान गेल्या दोन वर्षापासून दिल्या जाणाऱ्या राज्य पातळीवरील कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कारासाठी आलेल्या प्रस्तावांपैकी एकही व्यक्ती अथवा संस्थेची शिफारस निवड समितीने केलेली नाही. त्यामुळे हा पुरस्कार यावर्षी जाहीर झाला नाही.

**उत्कृष्ट महाविद्यालय, प्राचार्य, शिक्षक, कर्मचारी व संशोधक पुरस्कार विजेते पुढील प्रमाणे**

**उत्कृष्ट महाविद्यालय / परिसंस्था -** १) शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित, आर.सी. पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँण्ड रिसर्च, शिरपूर, जि. धुळे आणि जी.एच रायसोनी इन्स्टिट्युट ऑफ इंजि. अँण्ड बिझनेस मॅनेजमेंट, जळगाव संयुक्त पणे (व्यावसायिक), २) तापी परिसर विद्या मंडळ संचलित, धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर (अव्यावसायिक), **आदर्श विद्यापीठ प्रशाळा -** १) रासायनिक शास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, **उत्कृष्ट प्राचार्य** – प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर सुर्यवंशी (महात्मा गांधी शिक्षण प्रसारक मंडळाचे दादासाहेब सुरेश पाटील महाविद्यालय, चोपडा), **उत्कृष्ट शिक्षक** (महाविद्यालय) – १) डॉ. अनिल बारी (बोदवड महाविद्यालय, बोदवड) २) डॉ. विवेकानंद चटप (एच. आर. पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँण्ड रिसर्च, शिरपूर), **उत्कृष्ट शिक्षक (विद्यापीठ)** प्रा. डी.एच. मोरे (रसायन शास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव), **उत्कृष्ट अधिकारी (विद्यापीठ वर्ग -१)** – इंजि. राजेश पाटील (विद्यापीठ उपअभियंता, बांधकाम विभाग), **उत्कृष्ट कर्मचारी (विद्यापीठ वर्ग -३)** – १) रामानंद बऱ्हाटे (वरिष्ठ सहायक, संगणक केंद्र), २) संतोष गव्हाळे (लघुलेखक, सभा व दप्तर विभाग), **उत्तेजनार्थ** : १) चित्रांगा चौधरी (लघुलेखक,विधी व माहितीचा अधिकार विभाग), २) श्रीमती जयश्री देशमुख (वरिष्ठ सहायक, प्रशासन विभाग), **उत्कृष्ट कर्मचारी (विद्यापीठ वर्ग -४)** १) राजेश अवचारे (से.नि. शिपाई), २) बलभिम गिरी (कुशल परिचर, आरोग्य केंद्र), **दैनिक वेतनिक विद्यापीठ (उत्तेजनार्थ) :** १) समाधान पाटील (जनसंपर्क विभाग), २) भरत चौधरी (कुलसचिव कार्यालय), **उत्कृष्ट अधिकारी (महाविद्यालय वर्ग -२)** – संजय बागुल (रजिस्ट्रार, (एच. आर. पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँण्ड रिसर्च, शिरपूर), **उत्कृष्ट कर्मचारी (महाविद्यालय वर्ग -३)** -१) राजेंद्र कदम (कनिष्ठ लुघुलेखक, किसान कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पारोळा), २) सुनील पाटील (मुख्य लिपीक, पंकज कला महाविद्यालय, चोपडा), ३) गोपीचंद पाटील (अधिक्षक, सि.गो. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साक्री), ४) जितेंद्र शिरसाठ (लिपीक, एच.आर. पटेल इन्स्टिट्युट ऑफ फार्मा., शिरपूर), ५) कु. मीना शहा (वरीष्ठ लिपीक, डी.एच. अग्रवाल कला, श्रीरंग अवधुत वाणिज्य व सी.सी. शहा- एम.जी.अग्रवाल विज्ञान महाविद्यालय, नवापूर) **उत्कृष्ट कर्मचारी (महाविद्यालय वर्ग -४) -** १) नारायण बोबडे (प्रयोगशाळा परिचर, राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय, पारोळा),२) रवींद्र अहिरे (प्रयोगशाळा परिचर, गिताबाई महाजन कला, केशरीमल नवलखा वाणिज्य व मनोहरशेठ धारीवाल विज्ञान महाविद्यालय, जामनेर), ३) अंकुश गायकवाड (शिपाई, विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे), ४) दिनेश झिने (ग्रंथालय परिचर, संत जगनाडे महाविद्यालय, खापर, जि. नंदुरबार)

**विद्यापीठ शिक्षकांसाठी प्रकाशन पुरस्कार** १) प्रा. एस.एन पाटील (पर्यावरणशास्त्र प्रशाळा), २) प्रा.पी.पी. माहुलीकर (रसायनशास्त्र प्रशाळा) ३) डॉ. वंदना शिंदे (भौतिकशास्त्र प्रशाळा) ४) डॉ. विकास पाटील (रासायनिक तंत्रज्ञान संस्था), ५) डॉ.विकास गीते (रसायनशास्त्र प्रशाळा),६) प्रा. आर.एस. बेंद्रे, (रसायनशास्त्र प्रशाळा),७) डॉ. सतीश पाटील ( जैवशास्त्र प्रशाळा),

८) प्रा. जितेंद्र नाईक (रासायनिक तंत्रज्ञान संस्था), ९) डॉ. दीपक दलाल (रसायनशास्त्र प्रशाळा), **पेटंट पुरस्कार** – १) प्रा. जितेंद्र नाईक (रासायनिक तंत्रज्ञान संस्था) २) प्रा. आर.एस. बेंद्रे, (रसायनशास्त्र प्रशाळा), ३) डॉ. एस.आर. कोल्हे (संगणकशास्त्र प्रशाळा) **महाविद्यालयीन शिक्षकांसाठी संशोधन पुरस्कार (प्रकाशन ) -** १) डॉ. चंद्रगौडा पाटील (आर.सी.पटेल, इन्स्टिट्युट ऑफ फार्मास्युटीकल, शिरपूर) २) डॉ. लक्ष्मीकांत झंवर (एच.आर. पटेल, इन्स्टिट्युट ऑफ फार्मास्युटीकल, शिरपूर) ३) डॉ. अतुल शिरखेडकर (आर.सी.पटेल, इन्स्टिट्युट ऑफ फार्मास्युटीकल, शिरपूर) ४) डॉ. उज्वलदीप देवरे (आर.सी.पटेल, इन्स्टिट्युट ऑफ फार्मास्युटीकल, शिरपूर) ५) डॉ. लालचंद पटले (महात्मा गांधी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चोपडा), ६) डॉ. सौरभ खडसे (आर.सी.पटेल, इन्स्टिट्युट ऑफ फार्मास्युटीकल, शिरपूर) ७) डॉ. सौरभ गणोरकर (आर.सी.पटेल, इन्स्टिट्युट ऑफ फार्मास्युटीकल, शिरपूर) ८) डॉ. हितेंद्र महाजन (आर.सी.पटेल, इन्स्टिट्युट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन अँण्ड रिसर्च, शिरपूर), ९) डॉ. मोहन कळसकर (आर.सी.पटेल, इन्स्टिट्युट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन अँण्ड रिसर्च, शिरपूर), १०) डॉ. शैलेश चालिकवार (आर.सी.पटेल, इन्स्टिट्युट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन अँण्ड

रिसर्च, शिरपूर), ११) डॉ. कैलास मोरावकर (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), १२) डॉ. प्रवीण पाटील (एच.आर. पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), १३) डॉ. हारूण पटेल (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), १४) डॉ. गौरव धडसे (जी.एच. रायसोनी इन्स्टि., जळगाव). **पेटंट पुरस्कार –** १) डॉ. मधुचंद्र भुसारे (महात्मा गांधी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चोपडा), २) डॉ. संजयकुमार बारी (एच.आर. पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), ३) डॉ. अक्षय घोरपडे (गिताबाई महाजन कला, केशरीमल नवलखा वाणिज्य व मनोहरशेठ धारीवाल विज्ञान महाविद्यालय, जामनेर ), ४) डॉ. हारूण पटेल (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), ५) डॉ. लालचंद पटले (महात्मा गांधी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चोपडा), ६) डॉ. शैलेश चालिकवार (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), ७) डॉ. कैलास मोरावकर (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), ८) डॉ. मोहम्मद रागीब मोहम्मद उस्मान (शरदचंद्रीका पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, चोपडा), ९) ) डॉ. सौरभ गणोरकर (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल, शिरपूर)

**उत्कृष्ट केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प राबविणारे महाविद्यालये व समन्वयक (जळगाव जिल्हा) –** १) पु.ओ. नाहटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ, समन्वयक - प्रा. हर्षल पाटील (पु.ओ. नाहटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ), २) लोकसेवक मधुकरराव चौधरी फार्मसी महाविद्यालय, फैजपूर, समन्वयक - प्रा. मयुर नारखेडे (लोकसेवक मधुकरराव चौधरी फार्मसी महाविद्यालय, फैजपूर), ३) किसान महाविद्यालय, पारोळा, समन्वयक - प्रा. नितीन पाटील (किसान महाविद्यालय, पारोळा), ४) धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर, समन्वयक - डॉ. आर.डी. नारखेडे (धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर), ५) यशोदाबाई सराफ कॉलेज ऑफ फार्मसी साकेगाव, समन्वयक – कुंदन महाजन (यशोदाबाई सराफ कॉलेज ऑफ फार्मसी साकेगाव) **(धुळे जिल्हा)** – १) आर.सी.पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर, समन्वयक -प्रा. निलेश बाविस्कर (आर.सी.पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर) २) एस.पी.डी.एम. महाविद्यालय, शिरपूर, समन्वयक - प्रा. संदीप सोलंकी (एस.पी.डी.एम. महाविद्यालय, शिरपूर), २) झेङ बी. पाटील महाविद्यालय, धुळे, समन्वयक - प्रा. जे.सी. पाटील (झेङ बी. पाटील महाविद्यालय, धुळे) **(नंदुरबार जिल्हा)** - १) पीएसजीव्हीपीएसचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शहादा, समन्वयक – प्रा.वर्षा पाटील (पीएसजीव्हीपीएसचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शहादा), २) जी.टी.पी. महाविद्यालय, नंदुरबार, समन्वयक – प्रा. केशव परदेशी (जी.टी.पी. महाविद्यालय, नंदुरबार) ३) जिजामाता महाविद्यालय, नंदुरबार, समन्वयक – प्रा. अनिस कुरेशी (जिजामाता महाविद्यालय, नंदुरबार)

विद्यापीठातर्फे राज्यपातळीवरील कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कार यावर्षी शिक्षणक्षेत्रासाठी जाहीर करण्यात आला होता. त्यासाठी राज्यातील शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्था अथवा व्यक्तींकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. या पुरस्कारासाठी केवळ आठ प्रस्ताव प्राप्त झाले त्यामध्ये तीन संस्था पातळीवरील व पाच व्यक्तींचे प्रस्ताव होते. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. आर.एस. माळी यांच्या अध्यक्षतेखाली पुरस्कार निवड समिती गठीत करण्यात आली होती. त्यामध्ये सी.ओ.ई.पी. तंत्रशास्त्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुनील भिरूड व मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. अजय भामरे यांचा सदस्य म्हणून समावेश होता. पुरस्कारासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे समितीने अवलोकन केले व या पुरस्कारासाठी कोणत्याही प्रस्तावाची शिफारस केली नाही. त्यामुळे यावर्षीचा हा पुरस्कार दिला जाणार नाही.

....................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ८ ऑक्टोबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी